One Day Multidisciplinary

# National Conference on GLOBAL WARMING & HUMAN DEVELOPMENT

1990
'A' Grade
NAAC Re-accredited
(3rd Cycle)

'B' Grade
NAAC Accredited

## 30th Jan. 2019



▪ Sponsored by ▪

**Kavayitri Bahinabai Chaudhari, North Maharashtra University, Jalgaon.**

---

**Organized by**

NAAC Accredited 'B' Grade

Social and Cultural Association's

**Smt. Narmadabai Nago Chaudhari Arts, Comm, & Science College, Kusumba, Tal. & Dist. Dhule**

Email-ID:-nnccollegekusumba@rediffmail.com

| Sr.No. | Title of Research Paper | Authors | Page No. |
|---|---|---|---|
| | (MS) India. | Dhole J. A. | 68 |
| 93 | सम्राट अशोकाचे शिलालेख त्यांच्यावर झालेला जागतिक तापमान वाढीचा परिणाम | प्रदिप पुंडलिक सुर्यवंशी | 69 |
| 94 | ऐतिहासिक स्मारकांवर जागतिक तापमानवाढीचे परिणाम<br>विशेष संदर्भ : ग्वालियर किल्ला (म.प्र.) | भरत मधुकर लोंढे | 69 |
| 95 | संत साहित्यातील सामाजिक पर्यावरण | सतीश मस्के | 70 |
| 96 | भारतीय राज्यघटना आणि मानवाधिकार | डॉ. सौ. दिपीका अनिल चौधरी | 70 |
| 97 | मुघलकालीन स्थापत्यकला व वास्तूकलावर पर्यावरणाचा झालेला परिणाम | अनिल दिगंबर पवार | 71 |
| 98 | नंदुरबारजिल्ह्यातील बचत गटांच्या माध्यमातुन जागतिक पर्यावरण संवर्धन व जतन | बेसाणे शरद पंडीत .विदया राजेंद्र पाटील | 71 |
| 99 | शासकीय पर्यावरणीय संस्थाची भूमिका व कार्य | सुहास गजानन जोशी | 72 |
| 100 | संत साहित्य आणि पर्यावरण संवर्धन | रविंद्र पोपटराव ठाकरे | 72 |
| 101 | संत साहित्य आणि पर्यावरण | प्रा.बी.बी. गायकवाड | 73 |
| 102 | संतसाहित्य आणि पर्यावरण | जितेंद्र शामसिंग गिरासे<br>श्रीमती.देशमुख प्रतिभा रामदास | 73 |
| 103 | संत साहित्य आणि पर्यावरण | जितेंद्र शामसिंग गिरासे | 74 |
| 104 | आर्थिक विकासाचा पर्यावरणावर होणारा परीणाम | वैशाली हजारे | 75 |
| 105 | ग्रंथालयाच्या माहिती साक्षरता कार्यक्रमातून व्यक्तीमत्व विकास | गोपाल राजाराम पाटील | 75 |
| 106 | हवामानातील बदल आणि जागतिक तापमान – एक चिकित्सक अध्ययन | हेमलता गणेशराव ढगे | 76 |
| 107 | मानवी विकासात माहिती साक्षरता | योगेश एन. पाटील,<br>अनिल एम.चौधरी | 76 |

## संत साहित्यातील सामाजिक पर्यावरण

प्रा.डॉ.सतीश मस्के
मराठी विभागप्रमुख,कर्म.आ.मा.पाटील कला,वाणिज्य व कै.एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय,पिंपळनेर,ता.साक्री.जि.धुळे
मो.9423397484

महाराष्ट्र ही संतांची,वीरांची आणि शुरांची भूमी आहे. त्याच भूमीत संत ज्ञानेश्वर,एकनाथ,तुकाराम,नामदेव,गोराकुंभार,चोखामेळा,चक्रधर स्वामी,संत सावता माळी,संत सेना न्हावी असे कितीतरी संत जन्माला आले. ही भूमी संताची भूमी म्हणून ओळखली जाते. याच भूमीत संतांनी आपले स्वतःचे एक स्थान निर्माण केले आहे. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजातील माणसांच्या मनात आपले आगळे–वेगळे आदराचे स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य तळागाळातील माणसाच्या मनावर त्यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव आहे. आजही ग्रामीणच नाही, तर शहरी भागातील अज्ञानी,गरीब,शेतकरी,शेतमजूर,एवढेच नाही, तर अनेक सुशिक्षितांच्या मनावर त्याच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. उठता–बसता, खाता–पिता,चालता–बोलता त्यांचे नाव घेतले जाते. आज समाजात, घरात जे काही चांगले चालले आहे ते सारे संतांच्या आणि देवाच्या कृपेमुळेच चालले आहे, अशी समजूतही झाली आहे. काहीही चांगले–वाईट झाले तरी त्याचे श्रेय देवालाच दिले जाते. कारण संतांनी अध्यात्म, दैवत्य आणि अंधश्रध्दाही मोठया प्रमाणावर इथल्या जनमानसाच्या मनावर रूजवलेली आहे. ते उठता बसता घ्या देवाचे नाव या वाक्याच्या सततच्या उच्चारावरून लक्षात यायला लागते.

---

## भारतीय राज्यघटना आणि मानवाधिकार

प्रा. डॉ. सौ. दिपीका अनिल चौधरी
आदर्श ज्युनिअर कॉलेज, कुसुंबा. ता. जि. धुळे

### सारांश

१० डिसेंबर १९४८ रोजी मानव अधिकारांचे घोषणापत्र जाहिर झाले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना स्वीकृत करण्यात आली. घटनानिर्मितीच्या काळात मानव अधिकार घोषणापत्र निर्मितीची प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे या घोषणापत्राचा प्रभाव राज्यघटनेवर पडला. मानव अधिकारांचा समावेश राज्यघटनेत पुढीलप्रमाणे केलेला आहे.

राज्यघटनेला जोडलेली प्रस्तावना म्हणजे सरनामा होय. आम्ही भारतीय लोक अशी सरनाम्याची सुरूवात असून ही राज्यघटना आम्ही तयार, मान्य व स्वीकृत करित आहोत असा शेवट आहे. याचा अर्थ राज्यघटना लोकांनी तयार केलेली असून स्वेच्छेने स्वीकारलेली आहे. अधिकार जनतेपासून प्राप्त झालेले आहेत. जनता सार्वभौम आहे.भारत हे सार्वभौम,समाजवादी, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्य असेल. सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय दिला जाईल. विचार, अभिव्यक्ती, विश्वसा, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य असेल. दर्जा व संधीची समानता असेल व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता निर्माण करणारी बंधुता प्रस्थापित करण्याचे वचन आहे. या सर्वांचा अर्थ मानव अधिकारांवर आधारित उच्च संस्कृती करून नागरिकांना अधिकारांचा उपभोग घेता येईल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. सरनामा हा मानव अधिकारांचा मूलस्त्रोत आहे.